# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०१/०३/२०१९ रोजी सभा सुचना क्र. २० दि. २७/०२/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सायं. ४.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | मा. सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ६. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |
| ७. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ८. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ९. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| १०. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ११. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १४. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १५. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १६. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०१/०३/२०१९ रोजी सायं. ४.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २० मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र. २१०, **महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सॅनिटरी नॅपकीन मशीन खरेदी करणेबाबत. (महिला व बालकल्याण समिती सभा दि . १८/०२/२०१९ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र . २६, ठराव क्र. २६)**

**वर्षा भानुशाली :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सॅनिटरी नॅपकीन मशीन खरेदी करणे बाबत महिला व बालकल्याण समिती सभा दि. १८-०२-२०१९ प्रकरण क्र. २६ अन्वये पारित केलेला ठराव क्र. २६ नुसार ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**निला सोंस :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. २१० :-**

**महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सॅनिटरी नॅपकीन मशीन खरेदी करणेबाबत . ( महिला व बालकल्याण समिती सभा दि. १८/०२/२०१९ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र. २६, ठराव क्र. २६)**

**ठराव क्र. १७५ :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सॅनिटरी नॅपकीन मशीन खरेदी करणे बाबत महिला व बालकल्याण समिती सभा दि. १८-०२-२०१९ प्रकरण क्र. २६ अन्वये पारित केलेला ठराव क्र. २६ नुसार ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशली अनुमोदक :- श्रीम. निला सोंस**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २११, **महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "माझी कन्या सुकन्या " योजनेची अंमलबजावणी करणेबाबत. (महिला व बालकल्याण समिती सभा दि . १८/०२/२०१९ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र. २७, ठराव क्र. २७)**

**निला सोंस :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "माझी कन्या सुकन्या" योजनेची अंमलबजावणी करणे बाबत महिला व बालकल्याण समिती सभा दि. १८-०२-२०१९ प्रकरण क्र. २७ अन्वये पारित केलेला ठराव क्र. २७ नुसार ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वंदना मंगेश पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. २११ :-**

**महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "माझी कन्या सुकन्या" योजनेची अंमलबजावणी करणेबाबत. (महिला व बालकल्याण समिती सभा दि. १८/०२/२०१९ अन्वये शिफारस केलेले प्रकरण क्र. २७, ठराव क्र. २७)**

**ठराव क्र. १७६ :-**

महिला व बालकल्याण समिती अंतर्गत "माझी कन्या सुकन्या" योजनेची अंमलबजावणी करणे बाबत महिला व बालकल्याण समिती सभा दि. १८-०२-२०१९ प्रकरण क्र. २७ अन्वये पारित केलेला ठराव क्र. २७ नुसार ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. निला सोंस अनुमोदक :- श्रीम. वंदना मंगेश पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१२, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जागा आजारी पशुपक्षांच्या उपचारासाठी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**ध्रृवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या 1) भाईंदर (प.) 30 मीटर रेल्वे समांतर रस्त्यावरील अग्निशमन इमारत आवारातील शेड 2) मिरारोड (पू.) शांतीनगर एस.टी.पी. प्लांट जवळील शेड पशुपक्षासाठी दवाखाना महानगरपालिकेमार्फत तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर दवाखाने चालविण्यासाठी इच्छुक संस्थांकडून जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात आले होते. सदर कामाबाबत खालीलप्रमाणे संस्थांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) रेल्वे समांतर 30 मीटर रस्त्यावरील अग्निशमन इमारत आवारातील शेड | 1) **व्ही** केअर फाउंडेशन, मिरारोड (पू.)<br>2) अंहिसा चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प.) |
| 2. | मिरारोड (पुर्व) शांती नगर एसटीपी प्लांट जवळील शेड | 3) अंहिसा चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प.)<br>4) **व्ही** केअर फाउंडेशन, मिरारोड (पू.) |

वरील प्राप्त अर्जानुसार अ.क्र. 1 साठी **मे.** अंहिसा चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प.) **यांना व** अ.क्र. 2 साठी मे. वी केअर फाउंडेशन, मिरारोड (पू.) यांना देखभाल व **मालमत्तेच्या** दुरूस्तीकामी नेमणूक करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**दिप्ती भट :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

पशुपक्षाची देखभाल दुरुस्ती करणे.

**दिपक खांबित :-**

देखभाल व मालमत्तेची दुरुस्ती करणे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. २१२ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जागा आजारी पशुपक्षांच्या उपचारासाठी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**ठराव क्र. १७७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या 1) भाईंदर (प.) 30 मीटर रेल्वे समांतर रस्त्यावरील अग्निशमन इमारत आवारातील शेड 2) मिरारोड (पू.) शांतीनगर एस.टी.पी. प्लांट जवळील शेड पशुपक्षासाठी दवाखाना महानगरपालिकेमार्फत तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर दवाखाने चालविण्यासाठी इच्छुक संस्थांकडून जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात आले होते. सदर कामाबाबत खालीलप्रमाणे संस्थांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | संस्थेचे नाव |
|---|---|---|
| 3. | भाईंदर (प.) रेल्वे समांतर 30 मीटर रस्त्यावरील अग्निशमन इमारत आवारातील शेड | 5) **व्ही** केअर फाउंडेशन, मिरारोड (पू.)<br>6) अंहिसा चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प.) |
| 4. | मिरारोड (पुर्व) शांती नगर एसटीपी प्लांट जवळील शेड | 7) अंहिसा चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प.)<br>8) **व्ही** केअर फाउंडेशन, मिरारोड (पू.) |

वरील प्राप्त अर्जानुसार अ.क्र. 1 साठी **मे.** अंहिसा चॅरीटेबल ट्रस्ट, भाईंदर (प.) **यांना व** अ.क्र. 2 साठी मे. वी केअर फाउंडेशन, मिरारोड (पू.) यांना देखभाल व **मालमत्तेच्या** दुरूस्तीकामी नेमणूक करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. दिप्ती भट्ट**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१३, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शिया , सुन्नी, व इस्मायली खोजा समाजाच्या दफनभूमीचे मोफत देखभाल व संचलन करण्यासाठी संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

उपरोक्त प्रस्तावानूसार निविदा सुचनेनुसार सामाजिक संस्थानचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यानूसार त्यांनी मागणी केलेल्या दफनभूमीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) **मे. तन्झीम ए हक ट्रस्ट** मिरारोड यांनी शिया समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.
२) **मे. दारुल उलुम फैजान ए मुस्तफा एज्युकेशन ट्रस्ट** मिरारोड यांनी सुन्नी समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.
३) **मे. नव युवान सोसायटी, सृष्टी सेक्टर नं.४, मिरारोड ट्रस्ट** यांनी इस्मायली खोजा समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.
४) **मे. जामा मस्जिद अल शम्स एण्ड ऑरफॅंग ट्रस्ट** मिरारोड यांनी सुन्नी समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.
५) **मे. जाफरी वेलफेअर असोसिएशन बेहरीस्त ए. जेहरा कब्रस्तान ट्रस्ट,** मिरारोड यांनी शिया समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.

तरी १) मे. नवयुवान को.ऑ.हौ.सो.लि., या संस्थेस ईस्मायली खोजा दफनभुमी २) मे. तंजिम - ए - हक - चेरीटेबल ट्रस्ट मिरारोड या संस्थेस शिया दफनभुमी व ३) मे. जामा मस्जिद अल शम्स एण्ड ऑरफॅंग ट्रस्ट या संस्थेस सुन्नी दफनभूमी संचलन व देखभाल विनामुल्य करणे कामी सदर तीन वर्ष मुदतीसाठी नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये एकाने माघार घेतली आहे.

**जुबेर इनामदार :-**

सुन्नी दफनभूमीसाठी दोन संस्था आल्या होत्या. जामा मशिद अल शम्स मद्रासा ॲन्ड ऑर्फिनेट एज्यूकेशन ट्रस्ट आणि दुसरी दारुर उलूम फैजाने मुस्तफॉं एज्यूकेशन ट्रस्ट दारुर उलूम फैजाने मुस्तफॉं एज्यूकेशन ट्रस्ट ह्या संस्थेनी पत्र देऊन माघार घेतलेली आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. २१३ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शिया , सुन्नी, व इस्मायली खोजा समाजाच्या दफनभूमीचे मोफत देखभाल व संचलन करण्यासाठी संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**ठराव क्र. १७८ :-**

उपरोक्त प्रस्तावानूसार निविदा सुचनेनुसार सामाजिक संस्थानचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यानूसार त्यांनी मागणी केलेल्या दफनभूमीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) **मे. तन्झीम ए हक ट्रस्ट** मिरारोड यांनी शिया समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.
२) **मे. दारुल उलुम फैजान ए मुस्तफा एज्युकेशन ट्रस्ट** मिरारोड यांनी सुन्नी समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.
३) **मे. नव युवान सोसायटी, सृष्टी सेक्टर नं.४, मिरारोड ट्रस्ट** यांनी इस्मायली खोजा समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.

४) **मे. जामा मस्जिद अल शम्स एण्ड ऑरफॅग ट्रस्ट** मिरारोड यांनी सुन्नी समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.

५) **मे. जाफरी वेलफेअर असोसिएशन बेहरीस्त ए. जेहरा कब्रस्तान ट्रस्ट,** मिरारोड यांनी शिया समाजाची दफनभूमीचे संचलन व देखभाल करणे कामी मागणी केलेली आहे.

तरी १) मे. नवयुवान को.ऑ.हौ.सो.लि., या संस्थेस ईस्मायली खोजा दफनभुमी २) मे. तंजिम - ए - हक - चेरीटेबल ट्रस्ट मिरारोड या संस्थेस शिया दफनभुमी व ३) मे. जामा मस्जिद अल शम्स एण्ड ऑरफॅग ट्रस्ट या संस्थेस सुन्नी दफनभूमी संचलन व देखभाल विनामुल्य करणे कामी सदर तीन वर्ष मुदतीसाठी नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१४, **भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानात व्हॉलिबॉल/बॅडमिंटन कोर्टची दैनंदिन संचलन व देखभाल करणेसाठी देणेबाबत.**

**वर्षा भानुशाली :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानाच्या शेजारी असलेले व्हॉलीबॉल व बॅडमिंटन कोर्टची दैनंदिन संचलन व देखभाल करण्यासाठी खालील संस्थानी अर्ज केलेले आहे.

१) युनिटी स्पोर्टस
२) स्टार व्हिडिओ
३) न्यु आर.के स्पोर्टस

वर नमुद केलेल्या संस्थाचालकांपैकी मे. युनिटी स्पोर्टस यांनी संस्था नोंदणी प्रमाणपत्र (महा./२४१/२०१९/ठाणे/दि.०७/०२/२०१९) सादर केले आहे. त्यानुसार ते पात्र ठरत आहे.उर्वरीत दोन संस्थांनी नोंदणी प्रमाणपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरत आहेत.

सदर कोर्टची देखभाल व संचलन करण्याकरता दिल्यास सदर ठिकाणी स्वच्छता तसेच सुरक्षितता राहण्यास मदत होईल. तसेच कोर्टचा वापर होईल.

सदर ठिकाणी वाणिज्य वापर करता येणार नाही. तरी युनिटी स्पोर्टस यांना सदर कोर्ट १ वर्ष मुदतीसाठी रु.१०,०००/- सुरक्षा अनामत रक्कम घेऊन देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्यामध्ये माहिती पाहिजे. ठरावाच्या विरोधात बोलत नाही. युनायटेड स्पोर्टसचा विषय झाला होता. त्याच्यामध्ये त्याच्यावर गुन्हा दाखल आहे. मधल्या काळामध्ये सी.आर.झेड सर्वेक्षण झाले आणि त्यांनी बंदी घातली त्यांनी केबीन ठेवली. पाणी, विज चोरीचा प्रकार झाला होता. पालिकेने त्याला नोटीस बजावली होती. हीच युनायटेड स्पोर्टसचे आहे ना? हा तोच युनायटेड स्पोर्टस् आहे त्याच्या बातम्या लागल्या होत्या. त्याला आपण कसे पात्र करु शकतो.

**दिपक खांबित :-**

तिकडे पहिल्यापासून खेळ आहेत. आपला शेखर इलेक्ट्रीकल आहे त्याची मुल सगळे तिकडे त्यांना पहिल्यापासून करुन दिले तिकडे ते खेळतात. तिकडे इलेक्ट्रीकलचे सामान पडले होते. स्ट्रिट लाईटचे सामान आपण त्यांना काढायला लावले. सी.आर.झेड मॅंग्रोज लांब आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सुभाषचंद्र बोस मैदान खेळण्यासाठी त्या विषयाला आम्ही विरोध करत नाही. पालिकेने नोटीस दिली होती का?

**दिपक खांबित :-**

आम्ही नोटिस दिली होती त्याच्यामध्ये सर्व सामान काढले.

**जुबेर इनामदार :-**

आता युनायटेड स्पोर्टस् वाल्यांच्या विरोधात आपण नोटिस केली. परत त्यांना त्याच कामासाठी पात्र करतो.

**दिपक खांबित :-**

नोटिस दिली म्हणजे त्याचे सामान पडले होते. त्यांची पोर तिकडे खेळायची.

**जुबेर इनामदार :-**

विजेची चोरी असा प्रकार झाला आहे का?

**दिपक खांबित :-**

असा प्रकार झाला नाही.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. २१४ :-**

**भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानात व्हॉलिबॉल /बॅडमिंटन कोर्टची दैनंदिन संचलन व देखभाल करणेसाठी देणेबाबत.**

**ठराव क्र. १७९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानाच्या शेजारी असलेले व्हॉलीबॉल व बॅडमिंटन कोर्टची दैनंदिन संचलन व देखभाल करण्यासाठी खालील संस्थानी अर्ज केलेले आहे.

१) युनिटी स्पोर्टस
२) स्टार व्हिडिओ
३) न्यु आर.के स्पोर्टस

वर नमुद केलेल्या संस्थाचालकांपैकी मे. युनिटी स्पोर्टस यांनी संस्था नोंदणी प्रमाणपत्र (महा./२४१/२०१९/ठाणे/दि.०७/०२/२०१९) सादर केले आहे. त्यानुसार ते पात्र ठरत आहे.उर्वरीत दोन संस्थांनी नोंदणी प्रमाणपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरत आहेत.

सदर कोर्टची देखभाल व संचलन करण्याकरता दिल्यास सदर ठिकाणी स्वच्छता तसेच सुरक्षितता राहण्यास मदत होईल. तसेच कोर्टचा वापर होईल.

सदर ठिकाणी वाणिज्य वापर करता येणार नाही. तरी युनिटी स्पोर्टस यांना सदर कोर्ट १ वर्ष मुदतीसाठी रु.१०,०००/- सुरक्षा अनामत रक्कम घेऊन देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१५, **महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणूकीचे नवीकरण करणेबाबत.**

राकेश शाह :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थाापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मा . स्थायी समिती ठराव क्र .10 अन्वये 04 लघुटंकलेखक यांची किमार वेतन दरानुसार सहा महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी 02 लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित 02 लघुटंकलेखक कार्यरत आहेत.**

मा. महासभा ठराव क्र.138 अन्वये व दि.03/03/2016 रोजीच्या मा. महापौर यांचया अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दारानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लघुटंकलेखकची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्री. अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| 2. | श्री. गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा.स्थायी समिती सभा दि.29/09/2018 प्रकरण क्र.83 ठराव क्र.69 अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि .23/03/2019 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे . त्या अन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि.23/03/2019 रोजी संपुष्टात येणार आहे.

महानगरपालिका मा. महासभा, मा.स्थायी समिती सभा, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुकत (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहिण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्कता आहे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(3) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा . स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेचया कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखकांची दि .24/03/2019 रोजी रविवार सार्वनिक सुट्टी असल्याने दि.25/03/2019 रोजी एकदिवसाचा तत्रिक खंड देवून दि.26/03/2019 ते दि.25/09/2019 पर्यंत 06 महिन्याकरीता नव्याने नेमणुक करणेस ही सभा मंजूरी देत आहे , असा ठराव मांडत आहे.

मोहन म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. २१५ :-

महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणूकीचे नवीकरण करणेबाबत.

ठराव क्र. १८० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्था पनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मा . स्थायी समिती ठराव क्र .10 अन्वये 04 लघुटंकलेखक यांची किमार वेतन दरानुसार सहा महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी 02 लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित 02 लघुटंकलेखक कार्यरत आहेत.

मा. महासभा ठराव क्र.138 अन्वये व दि.03/03/2016 रोजीच्या मा. महापौर यांचया अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधि कृत केल्यानुसार किमान वेतन दारानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे

| अ.क्र. | लघुटंकलेखकची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्री. अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| 2. | श्री. गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा.स्थायी समिती सभा दि.29/09/2018 प्रकरण क्र.83 ठराव क्र.69 अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि .23/03/2019 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे . त्या अन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि.23/03/2019 रोजी संपुष्टात येणार आहे.

**महानगरपालिका मा. महासभा, मा.स्थायी समिती सभा, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुकत (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहिण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्कता आहे**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(3) नुसार तात्पु रत्या नेमणुकीसाठी मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.**

**महानगरपालिकेचया कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखकांची दि .24/03/2019 रोजी रविवार सार्वनिक सुट्टी असल्याने दि.25/03/2019 रोजी एकदिवसाचा तत्रिक खंड देवून दि.26/03/2019 ते दि.25/09/2019 पर्यंत 06 महिन्याकरीता नव्याने नेमणुक करणेस ही सभा मंजूरी देत आहे , असा ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. मोहन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २१६, **भारतरत्न पंडित भिमसेन जोशी व भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व अन्य वैद्यकिय आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकिय कर्मचारी यांना ०६ महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत.**

धृवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागातील भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व मिरा भाईंदर महानगरपालिका कक्षेतील तात्पुरत्या स्वरुपातील ठोक मानधनावर कार्यरत असलेले बालरोग तज्ञ (मासिक ठोक मानधन रु.**71,000/-**), वैद्यकीय अधिकारी (मासिक ठोक मानधन रु.**50625/-**), व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (मासिक ठोक मानधन रु.**18072**) सदर आरोग्य कर्मचाऱ्यांना **06** महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबतची यादी खालीलप्रमाणे **:-**

| अ.क्र. | नाव | पदनाम | मुदत संपुष्टात आली | नियुक्तीचे नवीकरण दिनांक |
|---|---|---|---|---|
| **1.** | श्री. उमेश सिंग | बालरोग तज्ञ | दि.**01/12/2018** | दि.**04/12/2018** ते दि.**23/05/2019** |
| **2.** | श्री. आदित्य शिरसाट | वैद्यकीय अधिकारी | दि.**01/12/2018** | राजीनामा दिला आहे. |
| **3.** | श्रीम. पतिक्षा भारमल | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी | दि.**13/01/2019** | दि.**15/01/2019** ते दि.**14/07/2019** |
| **4.** | श्री. गणेश पाटील | | दि.**13/01/2019** | दि.**15/01/2019** ते दि.**14/07/2019** |
| **5.** | श्री. महेश सोनावणे | | दि.**13/01/2019** | दि.**15/01/2019** ते दि.**14/07/2019** |
| **6.** | श्रीम. मनाली तारकर | | दि.**13/01/2019** | दि.**15/01/2019** ते दि.**14/07/2019** |
| **7.** | श्रीम. रुणाली कदम | | दि.**13/01/2019** | दि.**15/01/2019** ते दि.**14/07/2019** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | श्रीम. स्नेहल गुरव | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 9. | श्री. कमलेश सकपाळ | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 10. | श्रीम. रुपाली शेलवले | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |

सदर वैद्यकीय अधिकारी व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांची तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नियुक्ती केली असुन अनु.क्र.01 अधिकाऱ्याची सेवा दि.01/12/2018 रोजी संपूष्टात येत आहे. दि.02/12/2018 रोजी रविवार असल्याने दि.03/12/2018 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.04/12/2018 ते दि.23/05/2019 पर्यंत नियुक्तीचे नवीकरण करणे, अनु. क्र.02 यांना आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे . तसेच अनु.क्र.03 ते 10 कर्मचाऱ्यांची सेवा दि.13/01/2019 रोजी संपूष्टात येत असून त्यांना दि.14/01/2019 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 पर्यंत 06 महिन्यासाठी नियुक्तीस नवीकरण करणे आहे.

महाराष्ट्र अधिनियम कलम 53 (3) नुसार 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत मा. स्थायी समितीस अधिकार असल्याने वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना 01 दिवसाचा तांत्रीक खंड देऊन अनु. 01 यांना दि.23/05/2019 पर्यंत व अनु. 03 ते 10 या कर्मचाऱ्यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीचे नवीकरण करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. २१६ :-**

**भारतरत्न पंडित भिमसेन जोशी व भारतरत्न इं दिरा गांधी रुग्णालय व अन्य वैद्यकिय आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले वैद्यकिय कर्मचारी यांना ०६ महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. १८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागातील भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी , भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व मिरा भाईंदर महानगरपालिका कक्षेतील तात्पुरत्या स्वरुपातील ठोक मानधनावर कार्यरत असलेले बालरोग तज्ञ (मासिक ठोक मानधन रु.71,000/-), वैद्यकीय अधिकारी (मासिक ठोक मानधन रु.50625/-), व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (मासिक ठोक मानधन रु.18072) सदर आरोग्य कर्मचाऱ्यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबतची यादी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | नाव | पदनाम | मुदत संपुष्टात आली | नियुक्तीचे नवीकरण दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. उमेश सिंग | बालरोग तज्ञ | दि.01/12/2018 | दि.04/12/2018 ते दि.23/05/2019 |
| 2. | श्री. आदित्य शिरसाट | वैद्यकीय अधिकारी | दि.01/12/2018 | राजीनामा दिला आहे. |
| 3. | श्रीम. पतिक्षा भारमल | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 4. | श्री. गणेश पाटील | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | श्री. महेश सोनावणे | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 6. | श्रीम. मनाली तारकर | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 7. | श्रीम. रुणाली कदम | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 8. | श्रीम. स्नेहल गुरव | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 9. | श्री. कमलेश सकपाळ | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |
| 10. | श्रीम. रुपाली शेलवले | | दि.13/01/2019 | दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 |

सदर वैद्यकीय अधिकारी व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांची तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नियुक्ती केली असुन अनु.क्र.01 अधिकाऱ्याची सेवा दि.01/12/2018 रोजी संपूष्टात येत आहे. दि.02/12/2018 रोजी रविवार असल्याने दि.03/12/2018 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.04/12/2018 ते दि.23/05/2019 पर्यंत नियुक्तीचे नवीकरण करणे, अनु. क्र.02 यांना आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे . तसेच अनु.क्र.03 ते 10 कर्मचाऱ्यांची सेवा दि.13/01/2019 रोजी संपूष्टात येत असून त्यांना दि.14/01/2019 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.15/01/2019 ते दि.14/07/2019 पर्यंत 06 महिन्यासाठी नियुक्तीस नवीकरण करणे आहे.

महाराष्ट्र अधिनियम कलम 53 (3) नुसार 06 महिन्यांकरीता नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत मा. स्थायी समितीस अधिकार असल्याने वरीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना 01 दिवसाचा तांत्रीक खंड देऊन अनु. 01 यांना दि.23/05/2019 पर्यंत व अनु. 03 ते 10 या कर्मचाऱ्यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीचे नवीकरण करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१७, **MDR (Multi Drug Resistant) व XDR (Extensively Drug Resistant) क्षयरुग्णांचे Pre-Treatment Evaluation व Follow Up Examination खाजगी प्रयोगशाळेतून करणेबाबत.**

**मा. सभापती :-**

पडवळ साहेब ह्याची माहिती द्या.

**डॉ. चकोर :-**

साहेब आपल्याकडे मल्टीड्रग रेसिस्टन्ट टी.बी. आतापर्यंत आपण नॉर्मल टी.बी. ला ट्रीट करायचो. परंतु फस्ट लाईन जे ड्रग आहे त्याच्यानुसार ट्रीटमेन्ट करायचो. परंतु त्या ड्रगला रेसिस्टन्ट असल्यामुळे तो रेसिस्टन्ट बघण्यासाठी जे मशीन महापालिकेने खरेदी केले होते त्यासाठी आपल्याला काही टेस्ट करायला लागतात. म्हणजे ती ट्रीटमेन्ट चालू करण्याच्या आधी काही बेसिक टेस्ट आपल्याला करायला लागतात. त्या टेस्ट करण्यासाठी आपण ह्यापूर्वी तपासी लॅबमध्ये करत होतो. त्यासाठी महापालिकेची मंजूरी होती. परंतु

तपासी लॅब ही मिरारोडला असल्यामुळे पूर्ण डिस्ट्रीक मधल्या लोकांना मिरारोडला जाण्यासाठी त्रास होतो. म्हणून आपण डिसेन्ट्रलाइज्ड करुन ज्याठिकाणी पॅथोलॉजी बसलेले ज्यांची स्वतःची पॅथोलॉजी लॅब आहे अशा लॅबला डेजीगनेट केले आहे. तिथे आपण प्रिट्रिटमेन्टच्या रिव्हॅल्यूशनच्या टेस्ट करणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्या मधल्या बऱ्याच टेस्ट आपण आपल्याकडे करतो ना.

**डॉ. चकोर :-**

सगळ्याच टेस्ट आपल्याकडे प्रत्येक वेळा होत नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

रेटीना वैगेरे आपल्याकडे करतो ना.

**डॉ. चकोर :-**

होते परंतु काय होते हे एकाच वेळेस होणे गरजेचे आहे. कारण आपल्याला त्या स्टेप्यूलेटेड टाईममध्ये ते पेशंट चालू करणे गरजेचे आहे. ७ दिवसांमध्ये त्या पेशंटला ट्रीटमेन्टवर आणायचे असते. मग जर तो आपल्या हॉस्पीटलमध्ये गेला आणि टेस्ट झाल्या नाहीत तर त्याला प्रायव्हेट लॅबमध्ये जावे लागते.

**जुबेर इनामदार :-**

शासनाकडून ह्याच्यामध्ये मदत आहे.

**डॉ. चकोर :-**

शासनाकडून ह्याच्यासाठी मदत मिळत नाही.

**जुबेर इनामदार :-**

शासनाकडून क्षय रोगासाठी मदत आहे.

**डॉ. चकोर :-**

मागच्या वेळेला ८५ लाख बजेट सॅक्शन झाले होते. त्याच्यामध्ये आपल्याला पेशंटला द्यायला पैसे आहेत. जो पेशंट ट्रीटमेन्टला द्यायला पैसे आहेत जो पेशंट ट्रीटमेन्टवर आहे त्याला आपण ५०० रु. पर मन्थ देतो. जे प्रायव्हेट डॉक्टर आपल्याला नोटिफाय करतात पेशंट आहे म्हणून कळवतात त्याला आपण ५०० रुपये देतो आणि काही कन्सल्टन्ट त्यांची ट्रीटमेन्ट चालू ठेऊन त्याची ट्रीटमेन्ट पूर्ण करुन घेतात. त्याला पण ५०० रुपये देतो. ज्या लोकांकडे आपण मेडीसीन ठेवतो त्याला आपण ड्रॉप प्रोव्हायडर म्हणतो समजा पेशंट उत्तनचा असेल तर त्याला त्याच्या लोकल डॉक्टरकडे त्याला कन्हवेनियन असलेल्या डॉक्टरकडे मेडीसीन ठेवतो. त्या कॅटेगरीनुसार जी अमाऊंट अलोटेड आहे त्याप्रमाणे त्याला आपण अनुदान देतो.

**जुबेर इनामदार :-**

ह्या पेशंटसाठी शासनाकडून काही मदत वगैरे काही योजना वैगेरे नाहीत का?

**डॉ. चकोर :-**

प्रत्येक पेशंटला ५०० रुपये पर मन्थ देतो.

**जुबेर इनामदार :-**

उपचारासाठी.

**डॉ. चकोर :-**

उपचारासाठी त्यानंतर आपण त्यांना काही न्यूट्रीशियन पण आले.....

**जुबेर इनामदार :-**

न्यूट्रीशियनसाठी ५०० रुपये देता तो खाऊ तो घेऊ शकतो.

**डॉ. चकोर :-**

प्रिट्रीटमेन्ट देतो.

**जुबेर इनामदार :-**

मी शासनाच्या माध्यमातून विचारतो.

**डॉ. चकोर :-**

ड्रग रेसिटन्ट जे टी.बी. आहे त्याच्यामध्ये सेकन्ड लाईन ड्रग आहे. त्याला पण रेसिटन्ट झालेले आहे. त्यासाठी नविन ड्रग इन्ट्रोड्यूस केलेला आहे. बिडाक्यूलीन म्हणून जे मेडीसीन आहे ते आपण त्या पेशंटला देतो. एका टॅबलेटची किंमत १०,०००/- रुपये आहे. ती आपल्याला शासन पुरवते.

**जुबेर इनामदार :-**

ह्या टेस्ट आपल्या पालिकेला कराव्या लागतात.

**डॉ. चकोर :-**

हे आपण केले तर पेशंटला त्रास होणार नाही आणि त्या इमिजिएट होऊन जातील आणि रेप्यूटेड पॅथोलॉजीसकडे त्यांचीच नाव येतील.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येकी काय खर्च बसेल.

**डॉ. चकोर :-**

डिपेन्डस पेशंटच्या ह्याच्यानुसार.

**जुबेर इनामदार :-**

टेस्ट तर फिक्स असेल ना. पूर्ण टेस्ट करायला लागतात का?

**डॉ. चकोर :-**

हो पूर्ण टेस्ट करायला लागतात. मागच्या वर्षाचा डाटा बघितला तर १२० पेशंट आहेत.

**जुबेर इनमादार :-**

ह्या ज्या टेस्ट आहेत. त्याच्यात फार्मा क्लिनिक त्या लॅबची घेतली असेल ना.

**डॉ. चकोर :-**

हो आपण मागवले त्याच्यामध्ये रेडी आहेत करायला.

**धृवकिशोर पाटील :-**

ह्या टी.बी. च्या पेशंटला कम्पलीटली औषधोपचार फ्री देतो.

**डॉ. चकोर :-**

कम्पलीटली औषध देतो.

**धृवकिशोर पाटील :-**

मग पहिली टेस्ट पण आपणच करुन देतो.

**डॉ. चकोर :-**

टेस्ट पण आपण करुन देतो.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण हे काढले कारण की सोयीचे होईल.

**डॉ. चकोर :-**

ऑलरेडी तपासी लॅबमध्ये केले होते. परंतु प्रत्येक पेशंटला मिरारोडला जायला लागते.

**धृवकिशोर पाटील :-**

ह्या ज्या लॅब आहेत त्या कुठल्या कुठल्या एरियामध्ये आहेत.

**डॉ. चकोर :-**

प्रत्येक एरियातल्या म्हणजे ज्या-ज्या ठिकाणी सेंटर आहेत. त्याच्यामधल्या घेतल्या आहेत. ए.जे. डायग्नोस्टीक सेंटर मिरारोडला आहे, मल्याज लॅब हे मिरा भाईंदर रोड नवघरच्या एरियामध्ये म्हणजे रोडच्या लेफ्ट साईडला त्यांना तिथला लाभ घेता येईल. आर.के डायग्नोस्टिक आहे. इंदिरा नगर किंवा शिवशक्ती नगर किंवा नवघर गाव आहे त्यांना तिथे लाभ घेता येईल. सबरबन डायग्नोस्टिक आहे ते भाईंदर वेस्टला आहे, द लॅब आहे मिरा भाईंदर रोडवर ईस्टला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

एक उत्तन आणि हायवेला असते त्या लोकांना सोयीचे पडले असते.

**डॉ. चकोर :-**

सबरबन लॅबचे जे आहे त्याचे सेंटर वेस्टला पण आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

वेस्टचे ठीक आहे.

**हसमुख गेहलोत :-**

लॅब आहेत ते वेस्ट आणि ईस्टला दोन्ही ठिकाणी आहेत.

**डॉ. चकोर :-**

कुठेही घेऊ शकतो कारण उत्तन साईटला रेप्युटेड लॅब नाही. जिथे हे सगळे इनव्हेस्टीगेशन करु शकतो आणि आपण असे डी.एम.एल.टी. होणार आहेत ज्या लॅबचे त्यांना घेतले नाही.

**अनिता पाटील :-**

डॉक्टर साहेब मिरारोडला कुठली लॅब आहे.

**डॉ. चकोर :-**

मिरारोडला ए.जे.डायग्नोस्टीक लॅब आहे.

**अनिता पाटील :-**

मिरारोड किती मोठे आहे.

**डॉ. चकोर :-**

ज्या लोकांनी आपल्याला व्हॉल्टेन्टरी यस म्हटले आहे त्याच्यामध्ये आणखी काही लोकांनी यस म्हटले तर त्यांना पण आपण ........

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर भौगोलिक परिस्थिती आहे त्याप्रमाणे फेस करा. जसे हायवे, पेणकरपाडा किंवा काशिमिरा एरिया असेल ते सेंटर पडते. तुम्ही नेक्स्ट टाईम जेव्हा सिलेक्शन करणार...........

**डॉ. चकोर :-**

त्याच्यामध्ये आपण म्हटले आहे काही अजून तयार झाले तर त्याला सुध्दा आपण.....

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही सिलेक्शन करताना एकाच एरियाचे न करता वेगवेगळ्या एरियाचे करा. हायवेला एक, मिरारोड साईडला एक, कनाकिया परिसरात एक, भाईंदर ईस्ट वेस्ट अशाप्रकारे बायफरकेशन करा.

**डॉ. चकोर :-**

क्रायटेरीया हा ठेवला होता की रेप्यूटेड लॅब पाहिजे. नुसते डी.एम.एल.टी. आहे. म्हणून त्याला काही अर्थ नाही. तरी पण आपण त्याच्यात लिहिले आहे की हे लोक आपल्याला अप्रोच करतील त्यांना.............

**जुबेर इनामदार :-**

डॉक्टर घरोघरी जसे ब्लड सॅम्पल कलेक्ट करायला पोहोचतात सबरबनकडे मी रेग्युलर करतो. बरेच लोक करत असतील. ते रेप्यूटेड लॅब आहे. ते घरोघरी येतात तसे तुम्ही रेप्युटेड लॅबला हे काम द्या. त्यांनी तुमच्या आरोग्य केंद्रावर येऊन त्या रुग्णाचे ब्लड सॅम्पल घेतली पाहिजे.

**डॉ. चकोर :-**

आपण टी.बी. च्या टेस्ट करतो. ते नॉमिनल रेटमध्ये ते करणार आहेत. त्यामुळे आपण त्यांना रिक्वेस्ट करु शकतो.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण जर त्यांना एवढी सोय देतो.

**डॉ. चकोर :-**

ते तयार झाले तर आपण करु शकतो.

**धृवकिशोर पाटील :-**

ते तुम्ही इमेजिएट करा.

**अनिता पाटील :-**

आपल्या महापालिकेमार्फत होत असेल तर चांगला मेसेज लोकांपर्यंत जाईल.

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत MDR (Multi Drug Resistant) व XDR (Extensively Drug Resistant) क्षयरूग्णांवर PMDT (Programatic Managemat of Drug Resistant TB) अंतर्गत उपचार करण्यात येतात. सदर उपचार दिर्घ कालावधीसाठी, म्हणजे MDR साठी २४ ते २७ महिने आणि XDR साठी २४ ते ३० महिने, घ्यावे लागतात. नव्याने उपचारात वापर सुरू होणारे बेडॅक्विलीन औषध, औषधांना दाद न देणा-या जंतूपासुन बाधित झालेल्या क्षयरूग्णांना देण्यात येत आहे. सदर औषध अतिशय महाग आहे. शिवाय सदर आजार हा जीवघेणा व संसर्गजन्य असल्याकारणाने सदर आजाराने बाधित रुग्ण उपचार न मिळाल्यास सार्वजनिक आरोग्यासाठी मोठा धोका ठरू शकतात. सदर बाबी लक्षात घेता समाजातील MDR व XDR क्षयरूग्ण शोधणे व शोधलेले क्षयरूग्ण त्वरीत PMDT अंतर्गत औषधौपचाराखाली आणणे अत्यावश्यक आहे.

MDR व XDR क्षयरोगाचे निदान करण्यासाठी जे.जे. रूग्णालय व भारत स्व. इंदिरा गांधी रूग्णालय मिरारोड यांना शासनाने मान्यतप्राप्त केंद्र म्हणून प्रमाणित (Accredite) केलेल आहे. सदर ठिकाणावरून निदान

झालेल्या क्षयरूग्णांना PMDT अंतर्गत उपचार चालु करण्याबाबत निर्णय राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय, कळवा ठाणे व भा. पंडित भिमसेन जोशी रूग्णालय, भाईंदर (डॉट्स प्लस साईट on OPD Basis) येथील PMDT Site समिती घेते. त्यासाठी सदर रूग्णाचे Pre-treatment Evaluation स्थानिक पातळीवर करून सदर रूग्णास कमीतकमी ७ दिवस राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय येथे उभारण्यात आलेल्या विशेष क्षयरूग्णकक्षात भरती करण्यात येते.

Pre-Treatment Evaluation मध्ये खालील बाबींचा सामावेश होतो.

Checklist **for Initial Evaluation & Treatment Surveillance**

1) Initial physical Evaluation
2) Surgical Evaluation
3) Chest Radiograph
4) Laboratory Analysis, including
   a) Liver Function Tests
   b) Creatinine
   c) Blood urea
   d) Complete Blood Count
   e) Thyroid Function Test
   f) Urine Routine & Microscope
   g) Blood Sugar
   h) Serum Electrolytes
   i) ECG
   j) Serum Lipase
   k) Serum Amylase
   l) HBsAg
5) Pregnancy Test

**A) Checklist for Follow Up Examination**

1) Monthly Serum Creatinine.
2) Chest Radiograph
3) Complete blood count with platelets count (weekly in first Month & then monthly).
4) Kidney function test, monthly creatinine and monthly serum electrolytes.
5) Liver function tests, monthly in Intensive Phase three monthly in Continuation Phase.
6) Serum Lipase
7) Serum Amylase
8) HBsAg
9) CXR every 6 month.

जे रूग्ण राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय क्षयकक्षात भरती होण्यास किंवा भारत रत्न पंडित भिमसेन जोशी रूग्णालय येथे बाहयरूग्णस्तरावर उपचार चालू होण्यास पात्र ठरतील, त्यांच्यासाठी वरील तपासण्या स्थानिक पातळीवर मोफत उपलब्ध करून दयाव्यात, असे शासनाचे निर्देश आहेत.

वरील चाचण्या उपचार सुरू करण्यापूर्वी तसेच उपचार चालू असतानाही ठराविक कालावधीनंतर वेळोवेळी मिरा-भाईंदर मनपाच्या भारत रत्न इंदिरा गांधी रूग्णालय व भारत रत्न पंडित भिमसेन जोशी रूग्णालय येथुन कराव्या लागणार आहेत. तसेच ज्या ज्या वेळी कोणत्याही कारणास्तव मनपा प्रयोग शाळेत काही चाचण्या उपलब्ध नसतील तर अशा वेळी त्या चाचण्या खाजगी प्रयोग शाळेतुन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मा. उपायुक्त वैद्यकिय यांनी दि. २७/११/२०१७ रोजी महानगरपालिकेतील एम.डी.आर. व एक्स.डी.आर. रूग्णांना स्थानिक खाजगी प्रयोगशाळेतुन चाचण्या करण्यासंबंधी मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यामध्ये मे. तपासेज डायग्नोस्टीक सेंटर यांचे दर हे कमी व वाजवी असल्याने ते स्वीकारण्यास मा. उापयुक्त वैद्यकिय यांनी मजूरी दिली होती.

मा. पंतप्रधानांनी भारतातील वाढत्या क्षयरूग्णांबाबत चिंता व्यक्त केली असुन सन २०२५ पर्यंत क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खाजगी वैद्यकिय क्षेत्राचा सहभाग घेणे आवश्यक व अनिवार्य आहे.

सबब मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढला तर Drug Resistant रूग्णांचे प्रमाण कमी होईल. आतापर्यंत ज्या चाचण्या सरकारी प्रयोगशाळेतुन होत नाहीत, त्या तपासेज लॅबकडून करून घेतल्या जात आहेत. तपासेज लॅब ही मिरारोड कर्यक्षेत्रात असुन उत्तन ते घोडबंदर वरून रुग्णांना तपासेज लॅबला यावे लागते. त्यामुळे रुग्णांवर पडणारा जाण्या-येण्याचा आर्थिक भार कमी करण्यासाठी तसेच रूग्णाचा वेळ वाचविण्यासाठी प्रत्येक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील खाजगी निदान केंद्र येथे आवश्यकतेनुसार वरील प्रमाणे चाचण्या करून घेण्यासाठी संबंधित केंद्राकडून संमतीपत्र मागविली होती. सदर खाजगी निदान केंद्रांकडून प्राप्त संमती पत्रांपैकी १) ए.जे. डॉग्नोस्टिक सेंटर २) डॉ. माल्ल्याज पॅथॉलॉजी लॅब ३) आर.के. डायग्नोस्टिक सेंटर ४) सबर्बन डायग्नोस्टिक सेंटर ५) द लॅब व कार्यक्षेत्रातील इतर इच्छूक असलेले डायग्नोस्टिक सेंटर यांच्याकडून क्षयरूग्णांसाठी प्रयोगशाळा चाचण्या करून घेण्यासाठी व त्यापोटी येणारा अंदाजित वार्षिक खर्च रू. ५,००,०००/- "आरोग्य विषयक कार्यक्रम हाती घेणे" या लेखाशिर्षातर्गत तरतुदीमध्ये करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) अन्वये ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २१७ :-**

**MDR (Multi Drug Resistant) व XDR (Extensively Drug Resistant) क्षयरुग्णांचे Pre-Treatment Evaluation व Follow Up Examination खाजगी प्रयोगशाळेतून करणेबाबत.**

**ठराव क्र. १८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत MDR (Multi Drug Resistant) व XDR (Extensively Drug Resistant) क्षयरूग्णांवर PMDT (Programatic Managemat of Drug Resistant TB) अंतर्गत उपचार करण्यात येतात. सदर उपचार दिर्घ कालावधीसाठी, म्हणजे MDR साठी २४ ते २७ महिने आणि XDR साठी २४ ते ३० महिने, घ्यावे लागतात. नव्याने उपचारात वापर सुरू होणारे बेडॅक्विलीन औषध, औषधांना दाद न देणा-या जंतूपासुन बाधित झालेल्या क्षयरूग्णांना देण्यात येत आहे. सदर औषध अतिशय महाग आहे. शिवाय सदर आजार हा जीवघेणा व संसर्गजन्य असल्याकारणाने सदर आजाराने बाधित रुग्ण उपचार न मिळाल्यास सार्वजनिक आरोग्यासाठी मोठा धोका ठरू शकतात. सदर बाबी लक्षात घेता समाजातील MDR व XDR क्षयरूग्ण शोधणे व शोधलेले क्षयरूग्ण त्वरीत PMDT अंतर्गत औषधौपचाराखाली आणणे अत्यावश्यक आहे.

MDR व XDR क्षयरोगाचे निदान करण्यासाठी जे.जे. रूग्णालय व भारत स्व. इंदिरा गांधी रूग्णालय मिरारोड यांना शासनाने मान्यतप्राप्त केंद्र म्हणून प्रमाणित (Accredite) केलेल आहे. सदर ठिकाणावरून निदान झालेल्या क्षयरूग्णांना PMDT अंतर्गत उपचार चालु करण्याबाबत निर्णय राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय, कळवा ठाणे व भा. पंडित भिमसेन जोशी रूग्णालय, भाईंदर (डॉट्स प्लस साईट on OPD Basis) येथील PMDT Site समिती घेते. त्यासाठी सदर रूग्णाचे Pre-treatment Evaluation स्थानिक पातळीवर करून सदर रूग्णास कमीतकमी ७ दिवस राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय येथे उभारण्यात आलेल्या विशेष क्षयरूग्णकक्षात भरती करण्यात येते.

Pre-Treatment Evaluation मध्ये खालील बाबींचा सामावेश होतो.

<u>Checklist **for Initial Evaluation & Treatment Surveillance**</u>

1) Initial physical Evaluation
2) Surgical Evaluation
3) Chest Radiograph
4) Laboratory Analysis, including
   a) Liver Function Tests
   b) Creatinine
   c) Blood urea
   d) Complete Blood Count
   e) Thyroid Function Test
   f) Urine Routine & Microscope
   g) Blood Sugar

h) Serum Electrolytes
i) ECG
j) Serum Lipase
k) Serum Amylase
l) HBsAg

5) Pregnancy Test

**B) <u>Checklist for Follow Up Examination</u>**

1) Monthly Serum Creatinine.
2) Chest Radiograph
3) Complete blood count with platelets count (weekly in first Month & then monthly).
4) Kidney function test, monthly creatinine and monthly serum electrolytes.
5) Liver function tests, monthly in Intensive Phase three monthly in Continuation Phase.
6) Serum Lipase
7) Serum Amylase
8) HBsAg
9) CXR every 6 month.

जे रूग्ण राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय क्षयकक्षात भरती होण्यास किंवा भारत रत्न पंडित भिमसेन जोशी रूग्णालय येथे बाहयरूग्णस्तरावर उपचार चालू होण्यास पात्र ठरतील, त्यांच्यासाठी वरील तपासण्या स्थानिक पातळीवर मोफत उपलब्ध करून दयाव्यात, असे शासनाचे निर्देश आहेत.

वरील चाचण्या उपचार सुरू करण्यापूर्वी तसेच उपचार चालू असतानाही ठराविक कालावधीनंतर वेळोवेळी मिरा-भाईंदर मनपाच्या भारत रत्न इंदिरा गांधी रूग्णालय व भारत रत्न पंडित भिमसेन जोशी रूग्णालय येथुन कराव्या लागणार आहेत. तसेच ज्या ज्या वेळी कोणत्याही कारणास्तव मनपा प्रयोग शाळेत काही चाचण्या उपलब्ध नसतील तर अशा वेळी त्या चाचण्या खाजगी प्रयोग शाळेतुन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मा. उपायुक्त वैद्यकिय यांनी दि. २७/११/२०१७ रोजी महानगरपालिकेतील एम.डी.आर. व एक्स.डी.आर. रूग्णांना स्थानिक खाजगी प्रयोगशाळेतुन चाचण्या करण्यासंबंधी मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यामध्ये मे. तपासेज डायग्नोस्टीक सेंटर यांचे दर हे कमी व वाजवी असल्याने ते स्वीकारण्यास मा. उापयुक्त वैद्यकिय यांनी मजूरी दिली होती.

मा. पंतप्रधानांनी भारतातील वाढत्या क्षयरूग्णांबाबत चिंता व्यक्त केली असुन सन २०२५ पर्यंत क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खाजगी वैद्यकिय क्षेत्राचा सहभाग घेणे आवश्यक व अनिवार्य आहे.

सबब मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढला तर Drug Resistant रूग्णांचे प्रमाण कमी होईल. आतापर्यंत ज्या चाचण्या सरकारी प्रयोगशाळेतुन होत नाहीत, त्या तपासेज लॅबकडून करून घेतल्या जात आहेत. तपासेज लॅब ही मिरारोड कर्यक्षेत्रात असुन उत्तन ते घोडबंदर वरून रुग्णांना तपासेज लॅबला यावे लागते. त्यामुळे रुग्णांवर पडणारा जाण्या-येण्याचा आर्थिक भार कमी करण्यासाठी तसेच रूग्णाचा वेळ वाचविण्यासाठी प्रत्येक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील खाजगी निदान केंद्र येथे आवश्यकतेनुसार वरील प्रमाणे चाचण्या करून घेण्यासाठी संबंधित केंद्राकडून संमतीपत्र मागविली होती. सदर खाजगी निदान केंद्रांकडून प्राप्त संमती पत्रांपैकी १) ए.जे. डॉग्नोस्टिक सेंटर २) डॉ. माल्ल्याज पॅथॉलॉजी लॅब ३) आर.के. डायग्नोस्टिक सेंटर ४) सबर्बन डायग्नोस्टिक सेंटर ५) द लॅब व कार्यक्षेत्रातील इतर इच्छूक असलेले डायग्नोस्टिक सेंटर यांच्याकडून क्षयरूग्णांसाठी प्रयोगशाळा चाचण्या करून घेण्यासाठी व त्यापोटी येणारा अंदाजित वार्षिक खर्च रू. ५,००,०००/- ‘‘आरोग्य विषयक कार्यक्रम हाती घेणे’’ या लेखाशिर्षातर्गत तरतुदीमध्ये करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) अन्वये ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१८, **GenXpert मशिनची दुरुस्ती, कॅलीब्रेशन व CMC करणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

महानगरपालिकेने स्वत:च्या निधीतून **GeneXpert** मशिन खरेदी केले आहे. सदर मशीन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे कार्यरत आहे . सदर मशीनद्वारे दरमहा सुमारे **150-160** रुग्णांचे थुंकी व इतर नमुने तपासले जातात . तसेच नव्याने सुरु झालेल्या **Jeet Project** अंतर्गत खाजगी डॉक्टर्सकडूनही मोठ्या प्रमाणात नमुने येऊन तपासणीचा भार वाढत आहे.

सदर मशिनचे **A3 Module** नादुरुस्त असून ते बदलून मिळणेबाबत व मशिनचे **Calibration** व **CMC** करुन मिळण्याबाबत शहर क्षयरोग अधिकारी यांच्याकडून विनंती प्राप्त झाली आहे.

सदर मशिन सेफीड **(Cepheid)** या कंपनीकडून **2013** साली थेट खरेदी केले असून, सदर मशिनची ही एकमेव उत्पादक कंपनी आहे. कंपनीचे नादुरुस्त भागही याच कंपनीकडून उपलब्ध होऊ शकतात.

सदर कंपनीकडून दि . **05/10/2018** रोजी मशिनचे इन्स्पेक्शन होऊन त्यानुसार खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहे.

| Sr. No. | Product Code & Description | Amount |
|---|---|---|
| 1 | Ref. Module for GeneXpert for Machine Serial No. 804024 | 1,11,215/- |
| 2 | Xpent Check/Calibration kit machine Serial No. 804024 | 46,700/- |
| 3 | CMC for GeneXpert System Serial No. 804024 | 2,65,459/- |
| Total Amount | | 4,23,374/- |

मशिनची दुरुस्ती करण्यासाठी तसेच मशिनचे कॅलिब्रेशन करुन वार्षिक देखभाल करार करण्यासाठी रु. **4,23,375/-** खर्च अपेक्षित असून, मे. सेफीड या उत्पादक कंपनीला सदर रक्कम पुरवठा करण्यापूर्वी देणे आवश्यक आहे. सन **2018-19** या आर्थिक वर्षाकरीता रुग्णालये , सर्जिकल व फर्निचर उपकरणे खरेदी या लेखाशिर्षातील उर्वरित तरतूद रु . **24,16,302/-** मधुन **GeneXpert** मशिनची दुरुस्ती, कॅलिब्रेशन व वार्षिक देखभाल करार करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण **5 (2) (2)** अन्वये ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. २१८ :-**

**GenXpert मशिनची दुरुस्ती, कॅलीब्रेशन व CMC करणेबाबत.**

**ठराव क्र. १८३ :-**

महानगरपालिकेने स्वत:च्या निधीतून **GeneXpert** मशिन खरेदी केले आहे. सदर मशीन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे कार्यरत आहे . सदर मशीनद्वारे दरमहा सुमारे **150-160** रुग्णांचे थुंकी व इतर नमुने तपासले जातात . तसेच नव्याने सुरु झालेल्या **Jeet Project** अंतर्गत खाजगी डॉक्टर्सकडूनही मोठ्या प्रमाणात नमुने येऊन तपासणीचा भार वाढत आहे.

सदर मशिनचे **A3 Module** नादुरुस्त असून ते बदलून मिळणेबाबत व मशिनचे **Calibration** व **CMC** करुन मिळण्याबाबत शहर क्षयरोग अधिकारी यांच्याकडून विनंती प्राप्त झाली आहे.

सदर मशिन सेफीड **(Cepheid)** या कंपनीकडून **2013** साली थेट खरेदी केले असून, सदर मशिनची ही एकमेव उत्पादक कंपनी आहे. कंपनीचे नादुरुस्त भागही याच कंपनीकडून उपलब्ध होऊ शकतात.

सदर कंपनीकडून दि . **05/10/2018** रोजी मशिनचे इन्स्पेक्शन होऊन त्यानुसार खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहे.

| Sr. No. | Product Code & Description | Amount |
|---|---|---|
| 1 | Ref. Module for GeneXpert for Machine Serial No. 804024 | 1,11,215/- |
| 2 | Xpent Check/Calibration kit machine Serial No. 804024 | 46,700/- |
| 3 | CMC for GeneXpert System Serial No. 804024 | 2,65,459/- |
| | Total Amount | 4,23,374/- |

मशिनची दुरुस्ती करण्यासाठी तसेच मशिनचे कॅलिब्रेशन करुन वार्षिक देखभाल करार करण्यासाठी रु. **4,23,375/-** खर्च अपेक्षित असून, मे. सेफीड या उत्पादक कंपनीला सदर रक्कम पुरवठा करण्यापूर्वी देणे आवश्यक आहे. सन **2018-19** या आर्थिक वर्षाकरीता रुग्णालये, सर्जिकल व फर्निचर उपकरणे खरेदी या लेखाशिर्षातील उर्वरित तरतूद रु. **24,16,302/-** मधुन **GeneXpert** मशिनची दुरुस्ती, कॅलिब्रेशन व वार्षिक देखभाल करार करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण **5 (2) (2)** अन्वये ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१९, **परिवहन उपक्रमाच्या बसेसकरिता नविन टयुबलेस टायर पुरवठा करणेकामी निवीदा मंजुरी मिळणेबाबत.**

**जुबेर इनामदार :-**

एन.सी.सी. वर निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे ना.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

सन्मा. सभापती महोदयांच्या परवानगीने आपली जी एन.सी.सी. विथ फीजीएफ ही निविदा आपण काढली होती. पात्र निविदा उघडण्यात आल्या. ज्या लोएस्ट आहेत त्यांच्याबरोबर निगोसिएशन सुरु आहे. अजून ती अंतिम करण्यात आलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

ती निविदा कधी काढली?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

निविदा ०६ ऑक्टोबरला काढली होती.

**जुबेर इनामदार :-**

६ ऑक्टोबर २०१८ फायनान्शीयल बीड उघडून पात्र ठरलेला जो कोणी ठेकेदार असेल. निविदा प्रक्रिया पूर्ण म्हणजे कार्यपध्दत आहे ती ६/१० ला संपली.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

साहेब पब्लिश केली त्यानंतर आपल्याला रिस्पॉन्स येत नव्हता. मग वाढवत गेली. ती साधारणतः डिसेंबर एन्ड वैगेरे पात्र निविदा १५ डिसेंबर त्याच्यानंतर टेक्नीकल बीडचे इव्हॅल्युशनसाठी आपण आपल्या कन्सल्टन्टकडे पाठवले. टेक्नीकल बीड इव्हॅल्युशन होऊन आपल्यानंतर आपण निविदा फायनान्शीअल बीड उघडली. ती सुध्दा नंतर पुन्हा कन्सल्टन्टकडे फायनान्शीअल इव्हॅल्युशनसाठी पाठवली. त्यांच्याकडून

इव्हॅल्युशन होऊन आले. त्याच्यानंतर जो लोएस्ट बीडर आहे त्याच्याबरोबर निगोसिएशन करणे सुरु आहे. तीन्ही झालेली नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

डिसेंबर महिन्यापर्यंत तुमचा विषय आटपला असेल ना.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

कशाचा?

**जुबेर इनामदार :-**

पात्र निविदा कन्सलटन्टकडून येणारा त्यांचा अभिप्राय वैगेरे हा प्रकार.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

हो आलं ना.

**जुबेर इनामदार :-**

डिसेंबर २०१८ पर्यंत संपला की २०१८ च्या नंतरही चालला होता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

चालला ना. फायनान्शीअल बीडचे इव्हॅल्युशन आपल्याला जानेवारी महिन्यामध्ये आलं.

**जुबेर इनामदार :-**

जानेवारीच्या ३० तारखेपर्यंत संपली असेल का तुमची पूर्ण प्रोसेस. कारण आता फेब्रुवारीचे २८ दिवस संपले.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

प्रोसेस संपली नाही. कारण कस आहे की फायनान्शीयल बीडच्या इव्हॅल्युशननंतर.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही त्याला वाटाघाटीसाठी बोलवता.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

बरोबर.

**जुबेर इनामदार :-**

ते आलेच नाही का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

वाटाघाटीचे आले. परंतु ते दर जे वाटाघाटीने कमी करुन घेतात ते त्याच्या फायनान्शीअली त्याचे काय रिप्रफुशन आहेत. त्याबद्दलची तपासणी सुरु आहे. आपल्या आडपी मध्येच मेन्शन होत की आपण जो कोणी कॉन्ट्रॅक्टर, ऑपरेट राहील त्याला आपण बस वेल कंडीशनमध्ये देणार आहोत. म्हणजे चालू कंडीशनमध्ये देणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

सध्या आपल्या रोडवरील धावत्या बसेसची संख्या किती आहे?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपल्या टोटल ५८ बसपैकी साधारणतः ३०-३२ बस एव्हरेजनचे चालू आहेत.

**जुबेर इनामदार :-**

३० ते ३२.

**धृवकिशोर पाटील :-**

२००५-२०१० ला महापालिकेने कॉन्ट्रॅक्ट काढल होतं. त्यावेळी कॉन्ट्रॅक्टरला कंडिशन अशी दिली होती की, तुला ९० टक्के बस ऑन रोड ठेवायला पाहिजे. जर महापालिका कॉन्ट्रॅक्टरला कम्पलशन करते.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपण आताच्या नविन याच्यामध्ये तसेच केले आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापालिका कधीपासून ही बस ऑपरेट करते. गेली ५ वर्ष, ३ वर्ष ................

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आता आपण ऑक्टोबर २०१५ मध्ये ५-७ बसवरती सुरु केल होतं.

**धृवकिशोर पाटील :-**

आज काय चालू आहे फेब्रुवारी २०१९ कमीत कमी ३ ते ४ वर्ष. सर ३ ते ४ वर्षामध्ये आपण आपल्या ५० टक्के बस ऑपरेट करतो आहोत.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ह्या सगळ्या बस तेव्हा आलेल्या नाहीत. ह्या बस काही रिसेन्टली आलेल्या आहेत. ६ महिन्यापूर्वी आपण १० बस घेतल्या. त्यापूर्वीही आपण १०,१२,५,७ अशा आपण वाढवत गेलो होतो.

**धृवकिशोर पाटील :-**

आपल्या घरामध्ये एखादी गाडी असेल ना. सर ट्रान्सपोर्टचा माझा ही बिझनेस आहे. माझ्याकडे ५ डम्पर आहेत. त्यातला एक जरी डम्पर खराब झाला ना तर आम्ही इमिजिएटली रिपेअरींग करतो. ३ ते ५ दिवसांमध्ये त्याला ऑन रोड आणायची जबाबदारी असते. साहेब आज ५० टक्के आपल्या बसेस ऑफ रोड आहेत. आपण तेवढी पण जबाबदारी घेऊ शकत नाही का? आपण मॅक्झीमम करतो. तुमच्या प्रत्येक ठरावाला आमचा सपोर्ट असतो. प्रत्येक विषयाला आमचा सपोर्ट असतो. पण साहेब आज ५० टक्के आपल्या बसेस बंद आहेत. आपला रेव्हेन्यू पण लॉस होत आहे. मिरा भाईंदरच्या जनतेला आपण फॅसिलिटी पण देऊ शकत नाही. आपलं आद्य कर्तव्य आहे की त्यांना आपण बसेस दिल्या पाहिजेत. आपण त्यांची सोय केली पाहिजे. आपण काहीच करत नाही. आपण प्रत्येक कॉन्ट्रॅक्टरला कम्पलशन करतो की तुम्हाला एवढ करणे गरजेचे आहे. मग प्रत्येक अधिकाऱ्यांना आपण कम्पलशन का करु शकत नाही की जो आपल्या वाहन विभागाचा रिपेअरींगसाठी माणूस बसला आहे. तुला रिपेअरींग करुन आणलं पाहिजे. ही बस नादुरुस्त आहे. किती दिवस नादुरुस्त आहे. का राहिली ह्याचा लेखाजोखा आपण घेतला पाहिजे ना.

**जुबेर इनामदार :-**

बाकीच्या ३० बसेस नादुरुस्त का आहेत?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

